<u>दोषारोप</u>

रे.क्रि.के.नं. २२९/२०२२
शासन/ संभाजी
निशाणी क्र. ११

मी पी.एस.ठाकरे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, परंडा याव्दारे तुमचेवर खालील प्रमाणे दोषारोप ठेवत आहे.

संभाजी नारायण शिंदे,
वय–६२ वर्षे, धंदा – शेती,
रा. लोणी ता.परंडा जि.उस्मानाबाद.

१) दिनांक २६/०८/२०२२ रोजी सायंकाळी ०७.१५ वाजणेचे सुमारास मौजे लोणी ता. परंडा येथील संभाजी शिंदे याचे घराजवळील रोडवर तुम्ही आरोपीने फिर्यादीला तुमच्या हातातील काठीने फिर्यादीचे उजव्या हाताच्या मनगटावर मारून फिर्यादीचा हात फॅक्चर करून गंभीर दुखापत पोहचविली आणि याव्दारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ३२५ प्रमाणे शिक्षेस पात्र व माझे दखलपात्रतेतील अपराध केला.

२) उपरोक्त नमुद तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीने फिर्यादीस काठीने मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत पोहचविली आणि त्याव्दारे भारतीय दंड संहिता कलम ३२४ प्रमाणे शिक्षेस पात्र व माझे दखलपात्रतेतील अपराध केला.

३) उपरोक्त नमुद तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीने फिर्यादीला अडवून गैरपणे निरुध्द केले आणि याद्वारे भारतीय दंड संहीता कलम ३४१ प्रमाणे शिक्षेस पात्र व माझे दखलपात्रतेतील अपराध केला.

४) उपरोक्त नमुद तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीने फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी देवुन फौजदारीपात्र धाकदपटशा केला आणि त्यायोगे भारतीय दंड

संहिता कलम ५०६ सह ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र व माझे दखलपात्रतेतील अपराध केला.

यावद्दारे तुम्हास निर्देशित करण्यात येते की, उपरोक्त दोषारोप तुमचे विरुध्द माझे पुढे चालविण्यात येईल.

सही/—
(पी.एस.ठाकरे)
दिनांक:—२३/११/२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,परंडा.

प्रमाणपत्र.

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त दोषारोप आरोपीला वाचुन व समजावुन सांगण्यात आला.

सही/—
दिनांक:—२३/११/२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,परंडा.